कल्याण वाहतूक उपविभागाचे हददीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसुचना (सुधारीत)

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ 23 /२०२६ दि. २१/०१/२०२६

विषय :– वाहतूक नियंत्रण अधिसुचना सुधारीत करण्यात येत असले बाबत.

संदर्भ :– १) वाहतूक नियंत्रण अधिसुचना क्रमांक २४४, दिनांक ०४/११/२०२५ अन्वये
२) ठाणे पोलीस पत्रक दिनांक ०४/११/२०२५ अन्वये

——oo——

ज्याअर्थी, कल्याण शहारात वाढत्या वाहनांच्या रहदारीच्या आवागमानामुळे रस्त्यावर वाहनांची रहादारी हि संथ गतीने होत आहे. तसेच शहरात मोठया प्रमाणात जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस यांचे अवागमन होत आहे. टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस इतर खाजगी बसेस हया प्रवासी भरण्याकरीता शहराचे महत्वाचे चौकात बसेस थांबवित असतात. परीणामी सदर बसेच व जड– अवजड वाहने हि शहरात मोठया प्रमाणात वाहतुक कोंडी करण्यास कारणीभुत होत असून सदर बाबत शहरातील नागरीकांच्या जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस विरोधात तक्रारी प्राप्त होत असुन सदर वाहनांना शहरात प्रवेश बंदी बाबतची मागणी केली जात आहे. सद्या शहरात १) कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात स्मार्ट सिटी अंतर्गत रस्त्याचे व फ्लाय ओव्हर ब्रिजची कामे २) पत्री पुल ते गुरुदेव हॉटेल दरम्यान मेट्रो मार्गाचे कामे ३) पोर्णिमा चौक येथे वालणुनी ब्रिज चे काम ४) शहाड ब्रिज दुरुस्तीचे काम, तसेच शहारात अनेक ठिकाणी रस्ते दुरुस्ती कामे चालु आहेत. त्यामुळे **वाहतूक नियंत्रण अधिसुचना क्रमांक २४४, दिनांक ०४/११/२०२५ अन्वये अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली होती. परंतु कोळशेवाडी वाहतूक उप विभागाच्या हददीत खडेगोळवली नाक्यावरील जुना पुल तोडुन त्या ठिकाणी नवीन पुलाचे बांधकाम दिनांक २२/०१/२०२६ रोजी पासुन करण्यात येणार आहे. त्यामुळे वाहतूक नियंत्रण अधिसुचना क्रमांक २४४ मधिल अ.क्र.१ अन्वये प्रवेश बंद करण्यात आलेला रस्ता वाहतूकी करीता खुला करण्यात येवुन खालील प्रमाणे सुधारीत अधिसुचना प्रसारित करण्यात येत आहे.**

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालील प्रमाणे वाहतुक नियंत्रण अधिसुचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद –	**१)** शिळफाटा रोडने कोळसेवाडी व डोंबिवली कडुन पत्रीपुल मार्गे कल्याण शहारात येणारी जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस यांना **पत्रीपुल** ठिकाणी **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	शिळफाटा रोडने कोळसेवाडी व डोंबिवलीकडुन पत्रीपुल मार्गे कल्याण शहारात येणारी जड – अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस वाहनांना पत्री पुल येथे थांबा घेवून तेथुन डावे वळण घेवुन – गोविदवाडी बायपास मार्गे – दुर्गाडी किल्ला मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**२)** भिवंडी कडुन दुर्गाडी मार्गे व पडघा – गांधारी मार्गे येणारी जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस वाहनांना दुर्गाडी चौक, लाल चौकी मार्गे कल्याण शहरात प्रवेश करण्या करीता **दुर्गाडी चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	भिवंडी कडुन दुर्गाडी मार्गे व पडघा –गांधारी मार्गे येणारी जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस वाहने ही दुर्गाडी चौक येथे थांबा घेवून तेथुन कोळसेवाडी व डोंबिवलीकडे जातांना उजव्या बाजुने वळण घेवुन पुढे गोविदवाडी बायपास मार्गे पत्रीपुल या ठिकाणी थांबा घेवुन जातील किंवा ज्या बसेसना कोळसेवाडी किंवा डोंबिवली कडे जावयाचे आहे ती वाहने पत्री पुल मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**३)** उल्हासनगर,शहाड नाका येथुन येणारी जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस यांना **प्रेम अॅटो सर्कल चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	स्टरची वाहने ही उल्हासनगर मार्गे शहाड ब्रिज येथुन प्रेम अॅटो सर्कल येथुन उजवे वळण घेवुन बिर्ला कॉलेज – संदीप हॉटेल – खडकपाडा – आधारवाडी सर्कल मार्गे दुर्गाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद –	**४)** उल्हासनगर, शहाड नाका येथुन संतोषी माता रोडने सहजानंद चौक कडे येणारी जड– अवजड वाहने, टुर्स अॅन्ड ट्रॅव्हल्सच्या बसेस, इतर खाजगी बसेस, शासकीय बसेस यांना **इंदिरा नगर वळण** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही उल्हासनगर मार्गे शहाड ब्रिज येथुन बिर्ला कॉलेज – संदीप हॉटेल – खडकपाडा – आधारवाडी सर्कल मार्गे दुर्गाडी चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.
कल्याण मधुन जाणाऱ्या वाहनांना पर्यायी मार्ग –	कल्याणकडुन विठ्ठलवाडी, उल्हासनगर, अंबरनाथकडे जाणारी वाहने आधारवाडी चौक मार्गे प्रेम ऑटो सर्कल येथुन डाव्या बाजुने वळण घेवुन पुढे शहाड ब्रिज वरून उल्हासनगर वाहतुक उपविभाग हदीतुन शांतीनगर, पवई चौक, श्रीराम टॉकीज, (जुना विठ्ठलवाडीकडे जाणारा मार्ग) मार्गे इच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतुक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक २२/०१/२०२६ रोजी पासुन पुढे सकाळी ०६.०० ते रात्री २३.३० वा.पर्यंत अंमलात राहील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

– मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
– मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
– मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
– मा. जिल्हाधिकारी, ठाणे
– मा. आयुक्त, कल्याण–डोंबिवली/उल्हासनगर व महानगरपालिका
– मा. आयुक्त, भिवंडी–निजामपुर शहर महानगरपालिका भिवंडी.
– मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मुंबई
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–२/वि.शा.ठाणे.
– पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण
– पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, ठाणे शहर.
– उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण.
– परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली, महानगरपालिका
– विभाग नियंत्रण, राज्य परिवहन विभाग, ठाणे, कल्याण/विठठलवाडी.
– प्रादेशिक परिवहन अधिकारी भिवंडी, ठाणे.
– परिवहन व्यवस्थापक, भिवंडी
– विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, भिवंडी
– नियंत्रण कक्ष, ठाणे शहर/भिवंडी

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ, कल्याण वाहतूक विभाग व प्रभारी अधिकारी, कल्याण वाउपवि.